# ांचा !

**उत्तरे कोण देणार?**

ानुसार या पोलची
ाल-दुरुस्ती तीन वर्षे
ाराने करायची आहे.
ा विद्यापीठ चौकातील
पुन्हा बसवेपर्यंत आणखी
ी काळ जाणार आहे, हे
णे शक्य नाही. त्यामुळे
ुदतीचे काय होणार?

ट बिले सबमिट करून
घेण्याच्या हिशेबाने हे
करण्यात आल्याचे
न येते. आता विद्यापीठ
ातील पोलही काढून
ात येणार आहे. त्यामुळे
धित कंपनीला बिल
त येणार आहे का?

पोल उभारल्याचा 'करिश्मा'
केला.

# मराठा आरक्षणाबाबत मुख्यमंत्री गंभीर नाहीत

## आता कोणत्याही नेत्याशी चर्चा नाही

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८** - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे राम मंदिराबाबत बोलतात; पण शिवस्मारक उभारणी आणि मराठा समाजाच्या आरक्षणाबद्दल बोलत नाही. समाजाला आरक्षण मिळावे यासाठी ते अजिबात गंभीर नाही, असा आरोप मराठा क्रांती मोर्चाकडून करण्यात आला. तसेच, आता कोणत्याही नेत्याशी चर्चा करणार नाही. ९ ऑगस्ट रोजी मातोश्री आणि वर्षा या निवासस्थानाबाहेर आंदोलन करणार असल्याचे मोर्चाच्या समन्वयकांनी जाहीर केले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी २०१८ पासून मराठा क्रांती मोर्चाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहे. यासाठी राज्यभर व्यापक मोर्चे देखील काढले. तर, ४२ समाजबांधवांनी आत्महत्या केली. त्यांच्या कुटुंबियांना नोकरी देण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. मात्र, ते अद्यापही पूर्ण केलेले नाही. याऊलट समाजाचा राजकीय स्वार्थासाठी वापर करणे आणि समाज बांधवांमध्ये फूट पाडण्याचे काम सध्याचे सरकार करत आहे, अशी माहिती मोर्चाचे राज्य समन्वयक महेश डोंगरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मोर्चाचे नानासाहेब जावळे पाटील, संजय सावंत, पंजाबराव काळे, विजय घाडगे, आसाराम एरंडे उपस्थित होते.

- **९ ऑगस्ट रोजी मातोश्री, वर्षा निवासस्थानाबाहेर आंदोलन**
- **मराठा क्रांती मोर्चाकडून इशारा**

# करोना संकटकाळात मदतीचा हात

## फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनचा पुढाकार

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८** - करोना, 'निसर्ग' चक्रीवादळाचा तडाखा यामुळे देशभरातील नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या संकटकाळात फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनने (एमएमएफ) संपूर्ण देशभर मदतीचा हात दिला. विविध स्तरांतील वंचित घटकांना, तसेच करोना योद्धयांना पाठबळ देण्याचे काम फाउंडेशनने केले. 'एमएमएफ'चा २६ वा वर्धापन दिवस (दि.२६) नुकताच झाला. यानिमित्ताने व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांनी फाउंडेशनच्या कार्याबद्दल माहिती दिली. 'फाउंडेशनशी जोडल्या गेलेले सहकारी, कॉर्पोरेट दाते, स्वयंसेवक व स्वयंसेवी संस्थांच्या

सहकार्यामुळे या संकटांचा सामना करणे शक्य झाले,' असे त्या म्हणाल्या.

छाब्रिया म्हणाल्या, 'रोजंदारीवरील, स्थलांतरित मजूर, प्लंबर आदी घटकांना किराणा साहित्य किट, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. 'अन्नमित्र' आणि 'विकास खन्ना फीड इंडिया' यांच्या सहकार्याने एक लाखांपेक्षा जास्त लोकांना अन्न-धान्य दिले. तसेच पुण्यातून बाहेरगावी जाणाऱ्या १३ हजार स्थलांतरित मजुरांना चप्पल, खाद्यपदार्थ दिले. राजस्थानातील संगीत कलाकार, पुण्यातील तृतीयपंथी समाजाला रेशन देण्यात आले. कापडी मास्कच्या माध्यमातून एचआयव्हीग्रस्तांना रोजगार उपलब्ध करून दिला.'

या काळात रुग्णालयांच्या गरजा लक्षात घेऊन देशातील अनेक रुग्णालयांत वैद्यकीय उपकरणे, सॅनिटायझर, मास्क, पीपीई किट दिले. डॉक्टर्स, नर्स यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ते सर्व साहित्य फाउंडेशनने दिले आहे. वेंकिजच्या सहाय्याने एक लाख अंड्यांचे वाटप केले. निसर्ग, अम्फान चक्रीवादळासह आसाममध्ये नुकत्याच आलेल्या २० हजार पूरग्रस्तांना मदत पुरवली. पूर्व भारतात 'रंगीन खिडकी' संस्थेने सहकार्य केले.' असे छाब्रिया म्हणाल्या.